॥ श्रीनवनाथभक्तिसार ॥

Shri Navnath Bhaktisar

ADHYAYA 15 — PANCHADASHODHYAYA

श्रीगणेशाय नमः । श्रीगुरुभ्यो नमः । श्रीपांडुरंगाय नमः । श्रीकुलदेवतायै नमः । श्रीमातापितृभ्यां नमः ।

Shri Ganeshaaya Namah | Shri Gurubhyo Namah | Shri Paandurangaaya Namah | Shri Kuladevataayai Namah | Shri Maataa pitribhyaam Namah |

Summary

The fifteenth chapter *opens with Jaalindharnath still buried in the pit at Helapattan, and turns back to pick up two threads left hanging. At Badrikashram, Goraksha and Kanifa complete twelve years of penance, kept deliberately unaware of one another for the destiny that awaits them. Kanifa travels north searching for his guru while Goraksha journeys south searching for Machchindra, wandering like a man possessed and weeping like a fawn whose doe has forgotten him. Reaching Helapattan, Goraksha learns of a mysterious yogi named Jalandhar who vanished ten years prior and discovers him buried alive. Infuriated, Goraksha offers to violently overturn the kingdom, but Jalandhar refuses, declaring this ordeal is a prophecy meant to double the strength of the Nath path. He commands Goraksha to remain silent and find Kanifa, who is destined to save the king, lift the master from the pit, and expand the panth. Meanwhile, Kanifa accumulates seven hundred disciples on his travels, but they balk at the frontier of the dangerous Women's Kingdom, conspiring to abandon their master to save their own lives. Overhearing this, Kanifa uses the Sparshastra to trap the deserting disciples, freezing their limbs and pinning heavy stones to their backs until they weep and beg for initiation. That night, Maruti arrives from the Setu to roar them away, determined to keep Machchindra trapped within the kingdom. A fierce elemental duel ensues between Kanifa’s weapons and Maruti's cosmic strength, culminating in an Agnyastra that boils the ocean until Maruti is struck down senseless. Vayu intervenes to broker peace, and Kanifa promises not to speak Machchindra out of the kingdom. Entering the realm at last, Kanifa is met by a dismayed Machchindra, who mistakes him for Goraksha but rejoices upon learning he is Jalandhar’s son, welcoming his new guru-brother into his court for a month.*

Ovee 1

जयजयाजी जगत्पालका । मुनिमानसचकोरमृगांका । कृपांबुदातया पूर्णशशाकां । ग्रंथादरीं येई कां ॥

Transliteration

Jaya-jaya-ji Jagat-Paalakaa | Muni-maanasa-chakora-mrigaankaa | Kripaambudaa-tayaa poorna-shashaakaa | Granthaa-daree yaee kaa ||

Ovee 2

मागील अध्यायीं कथन । तुवां वदविलें कृपा करुन । गर्तकूपीं अग्निनंदन । गोपीचंदे घातला ॥

Transliteration

Maageela adhyaayee kathanu | Tuvaa vadavile kripaa karunu | Garta-koopee agni-nandanu | Gopeechande ghaatalaa ||

Ovee 3

घातला परी कैसा लाग । कीं कोठें नाहीं मूसमाग । जैसा शंकर गेल्यामाग । फसवूनि त्यासी वरियेलें ॥

Transliteration

Ghaatalaa paree kaisaa laagu | Kee kothe naahee moosa-maagu | Jaisaa Shankara gelyaa-maagu | Phasavuni tyaasee variyele ||

Ovee 4

असो पुढें आतां श्रोती । श्रवण करावी रसाळ उक्ती । सिंहावलोकनीं घेऊनि गती । मागील कथा विलोका ॥

Transliteration

Aso pudhe aataa shrotee | Shravana karaavee rasaala uktee | Sinha-avalokanee ghevuni gatee | Maageela kathaa vilokaa ||

Ovee 5

बद्रिकाश्रमीं पूर्ण तपासी । गोरक्ष कानिफा जान्हवीतीरासी । तप आचरितां द्वादशवर्षी । उद्यापन उरकिलें ॥

Transliteration

Badrikaa-Ashramee poorna tapaasee | Goraksha, Kaaniphaa Jaanhavee-teeraasee | Tapa aacharitaa dvaadasha-varshee | Udyaapana urakile ||

Ovee 6

परी याचें त्यासी नाहीं ठाऊक । कायाभुवनीं उभय अर्क । संगोपीत कामांतक । परी माहीत नाहीं अन्योन्यां ॥

Transliteration

Paree yaache tyaasee naahee thaaooku | Kaayaa-bhuvanee ubhaya Arku | Sangopeeta kaama-antaku | Paree maaheeta naahee anyonyaa ||

Ovee 7

पुढील भविष्योत्तर जाणून । गुप्त ठेविलें ओळखून । यापरी तप झालिया पूर्ण । उभयतांही बोळविलें ॥

Transliteration

Pudheela bhavishya-uttara jaanunu | Gupta thevile olakhunu | Yaaparee tapa jhaaliyaa poornu | Ubhaya-taanhee bolavile ||

Ovee 8

कानिफा निघाला उत्तरदेशीं । महातपी तो गोरक्षशेखी । उत्तरपूर्णमध्यकोणासी । संचार करीत चालिला ॥

Transliteration

Kaaniphaa nighaalaa uttara-deshee | Mahaa-tapee toh Goraksha-shekhee | Uttara-poorna-madhya-konaasee | Sanchaara kareeta chaalilaa ||

Ovee 9

प्रयाग गया काशी करुन । श्रीगुरुतें शोधी गजकर्णनंदन । यापरी पूर्ण दक्षिण कोण । गोरक्ष शोधी मच्छिंद्रा ॥

Transliteration

Prayaaga Gayaa Kaashee karunu | Shreeguru-te shodhee gaja-karna-nandanu | Yaaparee poorna dakshina konu | Goraksha shodhee Machchindraa ||

Ovee 10

शोधीत परी तो कैसा । कीं जलविण विभक्त मासा । कीं बाळ मातेचे वसवसा । सदोदित हृदयांत ॥

Transliteration

Shodheeta paree toh kaisaa | Kee jalavina vibhakta maasaa | Kee baala maateche vasavasaa | Sadodita hridayaantu ||

Ovee 11

नावडे त्यातें अन्नपाणी । नावडे निद्रा सुखासनीं । सदा भंवते भाविक मनीं । उद्वेगचक्रीं पडियेला ॥

Transliteration

Naavade tyaate annapaanee | Naavade nidraa sukha-aasanee | Sadaa bhavate bhaavika manee | Udvega-chakree padiyelaa ||

Ovee 12

श्रीगुरु आठवूनि चित्तांत । भ्रमण करीतसे पिशाचवत । सांडी श्वास आणूनि हेत । नाथ हे नाथ म्हणोनि ॥

Transliteration

Shreeguru aathavuni chittaantu | Bhramana kareetase pishaacha-vatu | Saandee shvaasa aanuni hetu | Naatha hey Naatha mhanoni ||

Ovee 13

वारंवार हंबरडे फोडीत । म्हणे कधीं भेटती गुरुनाथ । प्राण डोळां उरला किंचित । पाय आतां दाखवीं ॥

Transliteration

Vaaramvaara hambarade phodeetu | Mhane kadhee bhetatee Gurunaathu | Praana dolaa uralaa kinchitu | Paaya aataa daakhavee ||

Ovee 14

ऐसी प्रेमें होतसे वृष्टी । आपुल्या पुसे वागवटी । म्हणे पहिला असेल मच्छिंद्र जेठी । कोणी तरी सांगा हो ॥

Transliteration

Aisee preme hotase vrishtee | Aapulyaa puse vaagavatee | Mhane pahilaa asela Machchindra jethee | Konee taree saangaa ho ||

Ovee 15

ऐसें बहुधा बहुतां पुसून । नाना क्षेत्रीं करी गमन । तो भ्रमत गौडदेशाकारण । हेळापट्टणीं पातला ॥

Transliteration

Aise bahudhaa bahutaa pusunu | Naanaa kshetree karee gamanu | Toh bhramata gauda-deshaa-kaaranu | Helaa-pattanee paatalaa ||

Ovee 16

तपें मांस भक्षिलें समग्र । अति सूक्ष्म जर्जर शरीर । त्यावरी श्रीगुरुवियोगचिंताशर । हाडीं टोले मारीतसे ॥

Transliteration

Tape maansa bhakshile samagru | Ati sookshma jarjara shareeru | Tyaa-varee Shreeguru-viyoga-chintaa-sharu | Haadee tole maareetase ||

Ovee 17

जेथें बैसे तेथें वसे । नीरबिंदु वाहती नेत्रास । कार्याकारण कोण्या क्षेत्रास । भिक्षा मागूं जातसे ॥

Transliteration

Jethe baise tethe vase | Neerabindu vaahatee netraasu | Kaaryaa-kaarana konyaa kshetraasu | Bhikshaa maagoo jaatase ||

Ovee 18

तों हेळापट्टण नगरामाझारी । येऊनि बैसला क्षणभरी । तों द्वारपाळ ग्रामद्वारीं । बैसले होते कांहींसे ॥

Transliteration

Toh Helaapattana nagaraa-maajhaaree | Yeuni baisalaa kshanabharee | Toh dvaara-paala graama-dvaaree | Baisale hote kaanheense ||

Ovee 19

त्यांनीं पाहूनि गोरक्षनाथ । आदेश म्हणूनि त्यातें नमीत । परी गोरक्ष तयां द्वारपाळां पुसत । मच्छिंद्रनाथ आहे कीं ॥

Transliteration

Tyaannee pahuni Goraksha-Naathu | Aadesha mhanuni tyaate nameetu | Paree Goraksha tayaa dvaara-paalaa pusatu | Machchindra-Naatha aahe kee ||

Ovee 20

तंव ते म्हणती आमुचे गांवीं । मच्छिंद्र नामे कोणी गोसावी । महाराजा आलाचि नाहीं । काय सांगावी सुखव्यक्ती ॥

Transliteration

Tava tey mhanatee aamuche gaavee | Machchindra naame konee gosaavee | Mahaaraajaa aalaachi naahee | Kaaya saangaavee sukha-vyaktee ||

Ovee 21

परी नाथा एक तापसी । आला होता या गांवासीं । नाम जालिंदर या जगासी । मिरवत होता महाराजा ॥

Transliteration

Paree Naathaa eka taapasee | Aalaa hotaa yaa gaavaasee | Naama Jaalindara yaa jagaasee | Miravata hotaa Mahaaraajaa ||

Ovee 22

काय सांगावी तयाची नीती । लोकांसी वाटे जैसा गभस्ती । तो तृणभारा वाहतां माथीं । अधर आम्ही पाहातसों ॥

Transliteration

Kaaya saangaavee tayaachee neetee | Lokaansee vaate jaisaa gabhastee | Toh trina-bhaaraa vaahataa maathee | Adhara aamhee paahaataso ||

Ovee 23

गोरक्ष म्हणे काय कारण । मस्तकीं वाहतसे तृण । येरी म्हणे काननांतून । गोधनाकरितां आणीतसे ॥

Transliteration

Goraksha mhane kaaya kaaranu | Mastakee vaahatase trinu | Yeree mhane toh kaananaan-tunu | Godhanaa-karitaa aaneetase ||

Ovee 24

गोरक्ष म्हणे गोधन कोणाचें । येरी म्हणतीं तें गांवींचें । परी निःस्पृहवृत्ति गोधनाचें । पालन करी महाराजा ॥

Transliteration

Goraksha mhane godhana konaache | Yeree mhanatee tey gaaveenche | Paree nihspriha-vritti godhanaache | Paalana karee Mahaaraajaa ||

Ovee 25

गोरक्ष म्हणे किती दिवस । राहिला होता या वस्तीस । राहूनि लोप कवण ठायास । झाला पुढें तो सांगा ॥

Transliteration

Goraksha mhane kitee divasu | Raahilaa hotaa yaa vasteesu | Rahuni lopa kavana thaayaasu | Jhaalaa pudhe toh saangaa ||

Ovee 26

येरी म्हणती योगद्रुमा । एक संवत्सर राहिला या ग्रामा । पुढें गेला कोठे तें आम्हां । माहीत नाहीं महाराजा ॥

Transliteration

Yeree mhanatee Yogadrumaa | Eka samvatsara raahilaa yaa graamaa | Pudhe gelaa kothe tey aamhaa | Maaheeta naahee Mahaaraajaa ||

Ovee 27

याउपरी गोरक्षनाथ । दिवस किती लोटले ते पाहात । येरी म्हणे दश आजपर्यंत । लोटले संवत्सर महाराजा ॥

Transliteration

Yaauparee Goraksha-Naathu | Divasa kitee lotale tey paahaatu | Yeree mhane dasha aaja-paryantu | Lotale samvatsara Mahaaraajaa ||

Ovee 28

ऐसी ऐकूनि तयांची वाणी । गोरक्ष विचारी आपुले मनीं । तरी कां माझा स्वामी नाम पालटूनि । जगामाजी विचरला ॥

Transliteration

Aisee aikuni tayaanchee vaanee | Goraksha vichaaree aapule manee | Taree kaa maajhaa Svaamee naama paalatuni | Jagaa-maajee vicharalaa ||

Ovee 29

मी सांडूनि पूर्ण तपास । लागावया करीत येईन धांवत । म्हणूनि पालटिलें स्वनामास । गांवामाजीं मिरवला ॥

Transliteration

Mee sanduni poorna tapaasu | Laagaavayaa kareeta yaeena dhaavatu | Mhanuni paalatile sva-naamaasu | Gaavaa-maajee miravalaa ||

Ovee 30

ऐसी कल्पना आणूनि मनीं । अश्रुधारा वाहती नयनीं । म्हणे महाराजा गेलासी सोडुनी । मज पाडसा कैसा रे ॥

Transliteration

Aisee kalpanaa anuni manee | Ashrudhaaraa vaahatee nayanee | Mhane Mahaaraajaa gelaasee sodunee | Maja paadasaa kaisaa re ||

Ovee 31

टाकूनि निर्वाण काननांत । कोठें गेला माझा नाथ । मी अर्भक अज्ञान बाळक । बहुत मोकालिलें कैसें मज ॥

Transliteration

Taakuni nirvaana kaananaatu | Kothe gelaa maajhaa Naathu | Mee arbhaka ajnyaana baalaku | Bahuta mokaalile kaise maju ||

Ovee 32

हें नाथ तूं सकळमय । सर्वस्वी बापमाय । तुजवीण मातें कोण आश्रय । तिन्ही लोकीं दिसेना ॥

Transliteration

Hey Naatha too sakalamayu | Sarvasvee baapamaayu | Tujaveena maate kona aashrayu | Tinhee lokee disenaa ||

Ovee 33

अहा मज पाडसाची येरणी । चरुं गेली कोणे रानीं । माझें स्मरण सकळ सांडूनि । कैसी गुंतली तिकडेचि ॥

Transliteration

Ahaa maja paadasaachee yeranee | Charu gelee kone raanee | Maajhe smarana sakala sanduni | Kaisee guntalee tikadechi ||

Ovee 34

अहा मग वत्साची प्रेममाउली । कोण रानीं चरुं गेली । परी माझे स्मरण विसरली । कैसी गुंतली तिकडेचि ॥

Transliteration

Ahaa maga vatsaachee prema-maaulee | Kona raanee charu gelee | Paree maajhe smarana visaralee | Kaisee guntalee tikadechi ||

Ovee 35

अहा माझी मोहाची माय । करुं गेली अंतराय । मज ते विसरुनि सदयहृदय । कैसी गुंतली तिकडेचि ॥

Transliteration

Ahaa maajhee mohaachee maayu | Karu gelee antaraayu | Maja tey visaruni sadaya-hridaya | Kaisee guntalee tikadechi ||

Ovee 36

ऐसें बोलूनि विलाप करीत । ऊर्ध्व हंबरडा मारुनि धांवत । पोट कवळुनि श्वास सोडीत । अहा नाथ म्हणूनि ॥

Transliteration

Aise boluni vilaapa kareetu | Oordhva hambaradaa maaruni dhaavatu | Pota kavaluni shvaasa sodeetu | Ahaa Naatha mhanuni ||

Ovee 37

मग ते कानवाळू द्वारपाळ । म्हणती नाथा न करीं तळमळ । तुम्हां मायलेंकरांचा मेळ । ईश्वर करील पुढांरा ॥

Transliteration

Maga tey kaanavaaloo dvaara-paala | Mhanatee Naathaa na karee talamalu | Tumhaa maaya-lenkaraanchaa melu | Eeshvara kareela pudhaaraa ||

Ovee 38

ऐसी वदती ते वाणी । गांवांत धाडिला भिक्षेलागूनि । मग तो गोरक्ष सदनोसदनीं । अलक्ष गाजवीत जातसे ॥

Transliteration

Aisee vadatee tey vaanee | Gaavaata dhaadilaa bhikshe-laguni | Maga toh Goraksha sadano-sadanee | Alaksha gaajaveeta jaatase ||

Ovee 39

परी जालिंदर होतां ज्या ठायीं । तेथे सहज आला भिक्षेस पाहीं । तैं एकटएक सदन सांई । पाहुनि अलक्ष म्हणतसे ॥

Transliteration

Paree Jaalindara hotaa jyaa thaayee | Tethe sahaja aalaa bhikshesa paahee | Tai ekata-eka sadana saaee | Paahuni alaskha mhanatase ||

Ovee 40

तो सवाल ऐकूनि जालिंदरनाथ । आदेश म्हणत महीआंत । ते आदेश गोरक्षाप्रत । श्रवण झाले तांतडी ॥

Transliteration

Toh savaala aikuni Jaalindara-Naathu | Aadesha mhanat mahee-aatu | Tey aadesha Gorakshaa-pratu | Shravana jhaale taatadee ||

Ovee 41

मग ते आदेश वंदूनि पुढती । म्हणे कोठें आहांत महाराज जती । येरु म्हणे महीगर्ती । विराजलोसे महाराजा ॥

Transliteration

Maga tey aadesha vanduni pudhatee | Mhane kothe aahaata Mahaaraaja jatee | Yeru mhane mahee-gartee | Viraajalose Mahaaraajaa ||

Ovee 42

गोरक्ष म्हणे कवण नामीं । मिरवत आहांत नाथा स्वामी । येरी म्हणे मनोधर्मी । नाथ जालिंदर म्हणतात ॥

Transliteration

Goraksha mhane kavana naamee | Miravata aahaanta Naathaa svaamee | Yeree mhane manodharmee | Naatha Jaalindara mhanataatu ||

Ovee 43

परी महाराजा योगद्रुमा । कवण नाम मिरवतसे तुम्हां । आणि वरदहस्तप्रसादउगमा । गुरु कोण तुमचा हो ॥

Transliteration

Paree Mahaaraajaa Yogadrumaa | Kavana naama miravatase tumhaa | Aani varada-hasta-prasaada-ugamaa | Guru kona tumachaa ho ||

Ovee 44

गोरक्ष म्हणे मच्छिंद्रजती । वरदप्रसाद गुरुमूर्ती । आणि गोरक्ष नाम देहाप्रती । जगामाजी मिरवले ॥

Transliteration

Goraksha mhane Machchindra-jatee | Varada-prasaada guru-moortee | Aani Goraksha naama dehaa-pratee | Jagaa-maajee miravale ||

Ovee 45

परी महाराजा ऐकें युक्ती । तुम्ही सेविली महीगर्ती । जगीं प्रवेष्टुनी पाप मती । भंगित झाली लोकांची ॥

Transliteration

Paree Mahaaraajaa aike yuktee | Tumhee sevilee mahee-gartee | Jagee praveshtunee paapa matee | Bhangita jhaalee lokaanchee ||

Ovee 46

ऐसी ऐकूनि तयाची वार्ता । जालिंदर सांगे झाली कथा । ती ऐकतांचि गोरक्षनाथा । कोपानळ पेटला ॥

Transliteration

Aisee aikuni tayaachee vaartaa | Jaalindara saange jhaalee kathaa | Tee aikataanchi Goraksha-Naathaa | Kopaanala petalaa ||

Ovee 47

म्हणे महाराजा आज्ञा करावी । क्षणेंचि घालीन पालथी मही । तंव त्या नृपाची प्रौढी कांहीं । भस्म करीन क्षणांत ॥

Transliteration

Mhane Mahaaraajaa aajnyaa karaavee | Kshanenchi ghaaleena paalathee mahee | Tava tyaa nripaachee praudhee kaanhee | Bhasma kareena kshanaantu ||

Ovee 48

जैसा अग्नि पेटला सदनांत । तेणें तृणतंतूचें कोण गणित । तन्न्यायें येथील नृपनाथ । भस्म करीन महाराजा ॥

Transliteration

Jaisaa agni petalaa sadanaantu | Tene trinatantooche kona ganitu | Tannyaaye yetheela nripanaathu | Bhasma kareena Mahaaraajaa ||

Ovee 49

अहा ऐसी गुरुमूर्ती । देवां दानवां वरद अती । ऐशा स्वामीसी घालूनि गर्ती । राज्य कैसा करितो जी ॥

Transliteration

Ahaa aisee Guru-moortee | Devaa daanavaa varada atee | Aishaa svaameesee ghaaluni gartee | Raajya kaisaa karito jee ||

Ovee 50

तरी आतांचि आज्ञा प्रमाण । लागूं नेदी एक क्षण । मग जालिंदर बोले वचन । ऐसें नोहे महाराजा ॥

Transliteration

Taree aataachi aajnyaa pramaanu | Laagoo nedee eka kshanu | Maga Jaalindara bole vachanu | Aise nohe Mahaaraajaa ||

Ovee 51

या कार्याचें पुढें कार्य । नातरी हृदयीं विचारुनि पाहें । नाथपंथ येणें दुणावे । हेंचि भविष्य असे पहा ॥

Transliteration

Yaa kaaryaa-che pudhe kaaryu | Naataree hridayee vichaaruni paahe | Naatha-pantha yene dunaave | Henchi bhavishya ase pahaa ||

Ovee 52

तरी आतां क्षमा करुन । पुढें महाराजा करी गमन । परी हें ऐसें वर्तमान । बोलूं नको जगासी ॥

Transliteration

Taree aataa kshamaa karunu | Pudhe Mahaaraajaa karee gamanu | Paree hey aise vartamaanu | Boloo nako jagaasee ||

Ovee 53

तुम्ही हिंडता सहज महीसी । मम सुत कानिफा भेटतां तुम्हांसी । श्रुत करावें कृत्य त्यासी । वृत्तांत यथींचा सकळिक ॥

Transliteration

Tumhee hindataa sahaja maheesee | Mama suta Kaaniphaa bhetataa tumhaansee | Shruta karaave kritya tyaasee | Vrittaanta yatheenchaa sakaliku ||

Ovee 54

मग तो युक्तिप्रयुक्ती करुन । संपादूनि रायासी कल्याण । मातें काढील गर्तेंतून । वाढवील तो नाथपंथ ॥

Transliteration

Maga toh yukti-prayuktee karunu | Sampaaduni raayaasee kalyaanu | Maate kaadheela garte-tunu | Vaadhaveela toh Naatha-panthu ||

Ovee 55

ऐसें सांगूनि गोरक्षनाथ । आदेश म्हणू बोळवीत । आणि गोरक्ष ऐकूनि शांत । होऊनि आदेश म्हणतसे ॥

Transliteration

Aise sanguni Goraksha-Naathu | Aadesha mhanoo bolaveetu | Aani Goraksha aikuni shaantu | Houni aadesha mhanatase ||

Ovee 56

मग आदेश शब्देंचि गमन । करुनि निघाला गोरक्षनंदन । आहारापुरतें मेळवूनि अन्न । उपहारा संपादी ॥

Transliteration

Maga aadesha shabdenchi gamanu | Karuni nighaalaa Goraksha-nandanu | Aahaaraa-purate melavuni annu | Upahaaraa sampaadee ||

Ovee 57

मग शिंगी शेली करुनि ग्रहण । करिता झाला मार्गी गमन । तों जगन्नाथ प्राचीनस्थान । तेथें जाऊनि पोहोंचला ॥

Transliteration

Maga shingee shelee karuni grahanu | Karitaa jhaalaa maargee gamanu | Toh Jagannaatha praacheena-sthaanu | Tethe jauni pohonchalaa ||

Ovee 58

येरीकडे कानिफनाथ । गांवोगांवी भ्रमण करीत । परी ज्या गांवीं जाय तेथें । जगालागीं बोधीतसे ॥

Transliteration

Yereekade Kaaniphaa-Naathu | Gaavogaavee bhramana kareetu | Paree jyaa gaavee jaaya tethe | Jagaa-laagee bodheetase ||

Ovee 59

कानिफामुखाचिये बोधस्थिती । ऐकूनि परम जन मानवती । सलिलप्रेम दाटूनि चित्तीं । अनुग्रह घेती तयाचा ॥

Transliteration

Kaaniphaa-mukhaachiye bodha-sthitee | Aikuni parama jana maana-vatee | Salila-prema daatuni chittee | Anugraha ghetee tayaachaa ||

Ovee 60

मग त्या गांवांत एकेक दोन । सच्छिष्य निघती विरक्तमान । प्रपंचराहणी लाथ मारुन । नाथासवें चालती ॥

Transliteration

Maga tyaa gaavaant ekeka donu | Sachchishya nighatee virakta-maanu | Prapancha-raahanee laatha maarunu | Naathaa-save chaalatee ||

Ovee 61

ऐसे एक दोन पांच सात । दहाविसांचा मेळा जमत । होतां होतां सप्तशत । दाटले शिष्य समागमें ॥

Transliteration

Aise eka dona paancha saatu | Dahaa-visaanchaa melaa jamatu | Hotaa hotaa sapta-shatu | Daatale shishya samaagame ||

Ovee 62

पूर्वदेशीं करिता गमन । तो स्त्रीराज्य दोषसघन । तयाच्या सीमेपर्यंत जाऊन । उलट पाहती माघारां ॥

Transliteration

Poorva-deshee karitaa gamanu | Toh stree-raajya dosha-saghanu | Tayaachyaa seemeparyanta jaunu | Ulata paahatee maaghaaraa ||

Ovee 63

स्त्रीराज्यांत पुरुष कोणी । नाहीं हें विख्यात जनश्रुतकर्णी । म्हणोनि शिष्यमंडळ दणाणोनि । परतोनि पाहती माघारी ॥

Transliteration

Stree-raajyaanta purusha konee | Naahee hey vikhyaata jana-shruta-karnee | Mhanoni shishya-mandala danaanoni | Paratoni paahatee maaghaaree ||

Ovee 64

ठायीं ठायीं करिती विचार । म्हणती स्त्रीराज्यदेश तीव्र । तेथें प्रवेश करितां नर । वाचत नाहीं सहसाही ॥

Transliteration

Thaayee thaayee karitee vichaaru | Mhanatee stree-raajyadesha teevru | Tethe pravesha karitaa naru | Vaachata naahee sahasaahee ||

Ovee 65

ऐसा देश कठिण असून । स्वामी करिती तयांत गमन । तरी अग्निकुंडीं सकळां नेऊन । पूर्ण आहुती इच्छितसे ॥

Transliteration

Aisaa desha kathina asunu | Svaamee karitee tayaata gamanu | Taree agni-kundee sakalaa neunu | Poorna aahutee ichchitase ||

Ovee 66

जरी सेविल्या हलाहलातें । मग कोण पुरुष जगेल तेथे । जेवी तीव्र अग्नीत शिरतां तेथें । आहाळेना कैसे म्हणावे ॥

Transliteration

Jaree sevilyaa halaa-halaate | Maga kona purusha jagela tethe | Jevee teevra agneeta shirataa tethe | Aahaalenaa kaise mhanaave ||

Ovee 67

सदनीं प्रेरिला वैश्वानर । सदन झालें खदिरांगार । तयामाजी निघतां नर । वांचेल कैसा सहसा तो ॥

Transliteration

Sadanee prerilaa vaish-vaanaru | Sadana jhaale khadira-angaaru | Tayaa-maajee nighataa naru | Vaanchela kaisaa sahasaa toh ||

Ovee 68

कीं पतंग घेता दीपाची भेटी । त्याचि रीती येथें गोष्टी । दिसूनि येती परी शेवटीं । मृत्यु आम्हा दिसतसे ॥

Transliteration

Kee patanga ghetaa deepaachee bhetee | Tyaachi reetee yethe goshtee | Disuni yetee paree shevatee | Mrityu aamhaa disatase ||

Ovee 69

ऐसें होतां निश्चयवचन । कोणी म्हणती करापलायन । जीवित्व वाचल्या साधन । घडून येईल महाराजा ॥

Transliteration

Aise hotaa nishchaya-vachanu | Konee mhanatee karaa-palaayanu | Jeevitva vaachalyaa saadhanu | Ghaduna yaeela Mahaaraajaa ||

Ovee 70

एक म्हणती ऐसें करावें । सदृढ धरावे गुरुचे पाय । मग जीवित्वाचें भय काय । जातसे तरी जाऊं द्या ॥

Transliteration

Eka mhanatee aise karaave | Sadridha dharaave guruche paayu | Maga jeevitvaa-che bhaya kaayu | Jaatase taree jaaoo dyaa ||

Ovee 71

काया वाचा तनुमनधन । प्रथम त्यासी केलें अर्पण । मग या जीवित्वाची आस्था धरुन । व्रतालागीं कां भंगावें ॥

Transliteration

Kaayaa vaachaa tanumana-dhanu | Prathama tyaasee kele arpanu | Maga yaa jeevitvaachee aasthaa dharunu | Vrataa-laagee kaa bhangaave ||

Ovee 72

एक म्हणती लागलें वेड । कैचे व्रत पडिपाड । जीवित्व हरल्या व्रतकोड । कोणी दृष्टीं पाहिलें ॥

Transliteration

Eka mhanatee laagale vedu | Kaiche vrata padipaadu | Jeevitva haralyaa vratakodu | Konee drishtee paahile ||

Ovee 73

तरी हा अर्थ सांडूनि धन । या स्वामीलागीं चुकवून । गृहस्थांनो पलायन । करुनि जीवित्व वांचवा ॥

Transliteration

Taree haa artha sanduni dhanu | Yaa svaamee-laagee chukavunu | Grihasthaanno palaayanu | Karuni jeevitva vaanchavaa ||

Ovee 74

या स्वामीसी लागलें वेड । सादर मृत्युझांपड । जया ठायीं पडेल धाड । चालूनि जातो त्या ठायीं ॥

Transliteration

Yaa svaameesee laagale vedu | Saadara mrityu-jhaampadu | Jayaa thaayee padela dhaadu | Chaaluni jaato tyaa thaayee ||

Ovee 75
ऐसें तुम्हांसीं सत्य भासेल । तरी हे मानूनि घ्यावे बोल । जीवित्वाची आस्था असेल । तरी बोल फोल न मानावे ॥

Transliteration

Aise tumhaansee satya bhaaselu | Taree hey maanuni ghyaave bolu | Jeevitvaachee aasthaa aselu | Taree bola phola na maanaave ||

Ovee 76
ऐसें ठायीं ठायीं ताटीं । बैसूनि करिती बोलचावटी । परी हा अर्थ सकळ पोटीं । कानिफातें समजला ॥

Transliteration

Aise thaayee thaayee taatee | Baisuni karitee bola-chaavatee | Paree haa artha sakala potee | Kaaniphaate samajalaa ||

Ovee 77
मनांत म्हणे भ्याले सकळ । हीनबुद्धि अति दुर्बळ । परी आपुला प्रताप सांगतां तुंबळ । सत्य वाटणार नाहीं यांसी ॥

Transliteration

Manaanta mhane bhyaale sakalu | Heena-buddhi ati durbalu | Paree aapulaa prataapa saangataa tumbalu | Satya vaatanaara naahee yaansee ||

Ovee 78
मग करी कवळूनि भस्मचिमुटी । स्पर्शास्त्र प्रयोग पोटीं । जल्पूनि प्रेरी महीपोटी । तिन्ही दिशा लक्षुनी ॥

Transliteration

Maga karee kavaluni bhasma-chimutee | Sparsha-astra prayoga potee | Jalpuni preree mahee-potee | Tinhee dishaa lakshunee ||

Ovee 79
पुढील मात्र मार्ग ठेवूनि मोकळा । दिशा बंधन केल्या सकळा । केल्या परी ऐशा बळा । देवदानवां आतुळेना ॥

Transliteration

Pudheela maatra maarga thevuni mokalaa | Dishaa bandhana kelyaa sakalaa | Kelyaa paree aishaa balaa | Deva-daanavaa aatulenaa ||

Ovee 80
केले अर्थ द्व्यर्थपर । शिष्य पळूनि नाहीं जाणार । आणि मारुतीचाही भुभुःकार । पोहोचूं नये त्या ठाया ॥

Transliteration

Kele artha dvyarthaparu | Shishya paluni naahee jaanaaru | Aani Maaruteechaahee bhubhuhkaaru | Pohochoo naye tyaa thaayaa ||

Ovee 81
ऐसें स्पर्शास्त्र पृष्ठीं । रचूनि शांत बैसला जेठी । मग शिष्यां पाचारुनि शेवटीं । पुसता झाला तयासी ॥

Transliteration

Aise sparsha-astra prishthee | Rachuni shaanta baisalaa jethee | Maga shishyaa paachaaruni shevatee | Pusataa jhaalaa tayaasee ||

Ovee 82

लहान मोठे मेळवून । समुदायासी बैसवून । म्हणे आम्हांलागीं जाणें । स्त्रीराज्यांत आहे कीं ॥

Transliteration

Lahaana mothe melavunu | Samudaayaasee baisavunu | Mhane aamhaa-laagee jaane | Stree-raajyaanta aahe kee ||

Ovee 83

परी तो देश कठिण । वांचत नाही पुरुषरत्न । हनुमंतभुभुःकारेंकरुन । प्राणहानी होतसे ॥

Transliteration

Paree toh desha kathinu | Vaanchata naahee purusha-ratnu | Hanumanta-bhubhuh-kaaren-karunu | Praana-haanee hotase ||

Ovee 84

पुढें देश बहुत कठिण । परी आम्हांलागीं आहे जाणें । तया देशींचे तीर्थ करुन । येऊं ऐसें वाटतसे ॥

Transliteration

Pudhe desha bahuta kathinu | Paree aamhaa-laagee aahe jaane | Tayaa desheenche teertha karunu | Yeoo aise vaatatase ||

Ovee 85

आमुचा विश्वास गुरुपायीं । जरी असेल भवप्रवाहीं । तरी देशाची लंघूनि मही । पुनः येऊं माघारे ॥

Transliteration

Aamuchaa vishvaasa guru-paayee | Jaree asela bhava-pravaahee | Taree deshaachee langhuni mahee | Punah yeoo maaghaare ||

Ovee 86

नातरी सुखें जावो प्राण । परी मनाची धांव घेई पूर्ण । तरी तुमचा विचार कवण । तो मजप्रती दर्शवावा ॥

Transliteration

Naataree sukhe jaavo praanu | Paree manaachee dhaava gheyee poornu | Taree tumachaa vichaara kavanu | Toh majapratee darshavaavaa ||

Ovee 87

जें निःसीम गुरुच्या असती भवतीं । तिहीं धरावी माझी संगती । नातरी जीवलोभ असेल चित्तीं । तिहीं जावें माघारें ॥

Transliteration

Je nihseema guruchyaa asatee bhavatee | Tihee dharaavee maajhee sangatee | Naataree jeeva-lobha asela chittee | Tihee jaave maaghaare ||

Ovee 88

ऐसें सांगूनि बोलावीत । म्हणे देखिली बुद्धि करा येथ । मग निःसीम भक्तांचे किंचित । तया ठायी राहिले ॥

Transliteration

Aise sanguni bolaaveetu | Mhane dekhilee buddhi karaa yethu | Maga nihseema bhaktaanche kinchitu | Tayaa thaayee raahile ||

Ovee 89

सातशतांत सात जाण । ठायीं उरले स्थान धरुन । वरकड कंबरबस्ती करुन । कल्पिल्या मार्गी चालिले ॥

Transliteration

Saatashataanta saata jaanu | Thaayee urale sthaana dharunu | Varakada kambara-bastee karunu | Kalpilyaa maargee chaalile ||

Ovee 90

मनांत मानिती सुखवसा । म्हणती तस्कर बुद्धीचा ठसा । पळूनि जाता काजळीलेशा । मूर्खत्व येते आपणांसी ॥

Transliteration

Manaata maanitee sukhavasaa | Mhanatee taskara buddheechaa thasaa | Paluni jaataa kaajalee-leshaa | Moorkhatva yete aapanaasee ||

Ovee 91

तरी फार बरवें झालें । स्वामीनें अंतर ओळखिलें । उजळणीं बोळविले । कीर्तिमाहात्म्य रक्षुनी ॥

Transliteration

Taree phaara barave jhaale | Svaameene antara olakhile | Ujalanee bolavile | Keerti-maahaatmya rakshunee ||

Ovee 92

ऐसा चित्तीं सुखवसा मानून । आले पंथी करिती गमन । एक कोस गेले धांवून । सीमेपर्यंत ग्रामाच्या ॥

Transliteration

Aisaa chittee sukhavasaa maanunu | Aale panthee karitee gamanu | Eka kosa gele dhaavunu | Seemeparyanta graamaachyaa ||

Ovee 93

परी स्पर्शास्त्र सीमा लक्षून । बैसलें होतें मही वेष्टून । तेणें येतांच धरिलें कवळून । महिसीं दृढ केले ते ॥

Transliteration

Paree sparsha-astra seemaa lakshunu | Baisale hote mahee veshtunu | Tene yetaancha dharile kavalunu | Mahisee dridha kele tey ||

Ovee 94

पद झाले महीं व्यक्त । मागें पुढें ठेवाया नसे शक्त । जैसें सावज गुंतल्या चिखलांत । बळ कांहीं चालेना ॥

Transliteration

Pada jhaale mahee vyaktu | Maage pudhe thevaayaa nase shaktu | Jaise saavaja guntalyaa chikhalaantu | Bala kaanhee chaalenaa ||

Ovee 95

असो झाले महीं व्यक्त । म्हणूनि हस्ते काढूं जात । तों हस्त झाले महीं लिप्त । मग सकळ ओणवे झाले ॥

Transliteration

Aso jhaale mahee vyaktu | Mhanuni haste kaadhoo jaatu | Toh hasta jhaale mahee liptu | Maga sakala onave jhaale ||

Ovee 96

येरीकडे कानिफानाथ । त्या सातांतें बोलावूनि घेत । जवळ बैसवूनि सकळ वृत्तांत । निवेदिला तयांचा ॥

Transliteration

Yereekade Kaaniphaa-Naathu | Tyaa saataate bolaavuni ghetu | Javala baisavuni sakala vrittaantu | Nivedilaa tayaanchaa ||

Ovee 97

तुम्हीं करावें आतां ऐसें । शीघ्र जाऊनि त्या महीस । पाषाण करीं उचलोनि विशेष । तयांच्या पृष्ठीं स्थापावे ॥

Transliteration

Tumhee karaave aataa aise | Sheeghra jauni tyaa maheesu | Paashaana karee uchaloni visheshu | Tayaanchyaa prishthee sthaapaave ||

Ovee 98

मग विभक्तास्त्रविभूति । चर्चूनि तयांच्या भाळाप्रति । मागूनि पाठविले साती । समाचारा तयांच्या ॥

Transliteration

Maga vibhakta-astra-vibhooti | Charchuni tayaanchyaa bhaalaaprati | Maguni paathavile saatee | Samaachaaraa tayaanchyaa ||

Ovee 99

ते तंव श्रीगुरुचे आज्ञेकरुन । पहात चालिले सीमास्थान । तरी ते सर्वही ओणवे होऊन । ठायीं ठायीं खुंटले ॥

Transliteration

Tey tava Shreeguru-che aajnyekarunu | Pahaata chaalile seemaa-sthaanu | Taree tey sarvahee onave hounu | Thaayee thaayee khuntale ||

Ovee 100

सातांसी पाहूनि अवघ्या मूर्ती । परम चित्ती लज्जित होती । अधोवदन करुनि पाहती । परी न देती उत्तर ॥

Transliteration

Saataansee pahuni avaghyaa moortee | Parama chittee lajjita hotee | Adho-vadana karuni paahatee | Paree na detee uttaru ||

Ovee 101

हे जाऊनि बोलती त्यांतें । कैसें सोडूनि गुरुतें । जीवित्वलोभ धरुनियां मनातें । मार्ग केला पुढारां ॥

Transliteration

Hey jauni bolatee tyaante | Kaise soduni gurute | Jeevitva-lobha dharuniyaa manaate | Maarga kelaa pudhaaraa ||

Ovee 102

परी ईश्वराची अगाध करणी । सकळ पडला महीं खिळूनी । ऐसिया रीतीं कोण तरुनी । गेला आहे सांगा पां ॥

Transliteration

Paree Eeshvaraachee agaadha karanee | Sakala padalaa mahee khiluunee | Aisiyaa reetee kona tarunee | Gelaa aahe saangaa paa ||

Ovee 103

मग हस्तें सकळ पाषाण । पृष्ठीं ठेविती बळेंकरुन । स्पर्श होतांचि जाती चिकटून । आंग हालवितां पडेना ॥

Transliteration

Maga haste sakala paashaanu | Prishthee thevitee bale-karuni | Sparsha hotaanchi jaatee chikatunu | Aanga haalavitaa padenaa ||

Ovee 104

मग परम आक्रंदती । चुकलों चुकलों ऐसें म्हणती । आतां क्षमा करुनि चित्तीं । सोडवावें आम्हांतें ॥

Transliteration

Maga parama aakrandatee | Chukalo chukalo aise mhanatee | Aataa kshamaa karuni chittee | Sodavaave aamhaante ||

Ovee 105

येरु म्हणती खुशाल असा । जीवित्वाचा धरुनि भरंवसा । स्वामी पाहूनि आलिया देशा । सोडवूनि नेऊं तुम्हांसी ॥

Transliteration

Yeru mhanatee khushaala asaa | Jeevitvaachaa dharuni bharavasaa | Svaamee pahuni aaliyaa deshaa | Sodavuni neoo tumhaansee ||

Ovee 106

गुरु करितां हा कशाला । संकट पडतां काढितां पळा । परी ज्याची क्रिया त्याची त्याला । फलद्रूप होतसे ॥

Transliteration

Guru karitaa haa kashaalaa | Sankata padataa kaadhitaa palaa | Paree jyaachee kriyaa tyaachee tyaalaa | Phaladroopa hotase ||

Ovee 107

आतां स्वस्थ असा चित्तीं । आम्ही जातो स्त्रीदेशाप्रती । दैवें वांचूनि आलिया अंतीं । सोडवूनि नेऊं तुम्हांतें ॥

Transliteration

Aataa svastha asaa chittee | Aamhee jaato stree-deshaa-pratee | Daive vaanchuni aaliyaa antee | Sodavuni neoo tumhaante ||

Ovee 108

ऐसें सकळा करुनि भाषण । सकळां पृष्ठीं देऊनि पाषाण । परतते झाले गुरुआज्ञेकरुन । परी ते पाहूनि आरंबळती ॥

Transliteration

Aise sakalaa karuni bhaashanu | Sakalaa prishthee deuni paashaanu | Paratate jhaale Guruaajnyekarunu | Paree tey pahuni aarambalatee ||

Ovee 109

म्हणती गुरुमायेहूनि माय । होऊनियां सदयहृदय । आम्हांसही सवें न्यावें । स्त्रीराज्यामाझारीं ॥

Transliteration

Mhanatee Guru-maayehuni maayu | Houniyaa sadaya-hridaya | Aamhaansahee save nyaave | Stree-raajyaa-maajhaaree ||

Ovee 110

आमुची सकळ गेली भ्रांती । आणि गुरुची समजली प्रतापशक्ती । आतां सकळ नासूनि दुर्मती । विश्वासातें टेंकलों ॥

Transliteration

Aamuchee sakala gelee bhraantee | Aani guruchee samajalee prataapa-shaktee | Aataa sakala naasuni durmatee | Vishvaasaate tenkalo ||

Ovee 111

ऐसी करितां विनवणी । ती ऐकिली सातजणीं । मग म्हणती श्रीगुरुतें सांगुनी । सुटका करुं तुमची ॥

Transliteration

Aisee karitaa vinavanee | Tee aikilee saatajanee | Maga mhanatee Shreeguru-tey saangunee | Sutakaa karu tumachee ||

Ovee 112

ऐसें बोलूनि सकळांकारण । पुनः आले परतून । म्हणती महाराजा दैन्यवाण । शिष्यकटक मिरवले ॥

Transliteration

Aise boluni sakalaankaaranu | Punah aale paratunu | Mhanatee Mahaaraajaa dainyavaanu | Shishya-kataka miravale ||

Ovee 113

त्यांची नासिली सकळ भ्रांती । पृष्ठीं पाषाण घेऊनि आरंबळती । तरी आतां कृपा ओसंडोनि चित्तीं । मुक्त करा सर्वांतें ॥

Transliteration

Tyaanchee naasilee sakala bhraantee | Prishthee paashaana ghevuni aarambalatee | Taree aataa kripaa osandoni chittee | Mukta karaa sarvaante ||

Ovee 114

आतां येथूनि गेलिया प्राण । सोडणार नाहीं आपुले चरण । सर्वही स्थिरमती धरुन । चरणावरी लोटतील ॥

Transliteration

Aataa yethuni geliyaa praanu | Sodanaara naahee aapule charanu | Sarvahee sthira-matee dharunu | Charanaa-varee lotateelu ||

Ovee 115

नाना युक्तींकरुन । करितील श्रीगुरुचें समाधान । हें सच्छिष्यांचे ऐकूनि वचन । नाथ चित्तीं तोषला ॥

Transliteration

Naanaa yuktee-karuni | Kariteela Shreeguru-che samaadhaanu | Hey sachchishyaanche aikuni vachanu | Naatha chittee toshalaa ||

Ovee 116

मग विभक्तास्त्रमंत्र होटीं । जल्पूनि योजिली भस्मचिमुटी । ओपूनि शिष्या करसंपुटी । म्हणे चर्चूनि यावे तयातें ॥

Transliteration

Maga vibhakta-astra-mantra hotee | Jalpuni yojilee bhasma-chimutee | Opuni shishyaa kara-samputee | Mhane charchuni yaave tayaate ||

Ovee 117

मग एक शिष्य जाऊनि तेथें । भाळीं चर्चूनि भस्मचिमुटातें । चर्चिता झाले सकळ मुक्त । साता उणे सातशें ॥

Transliteration

Maga eka shishya jauni tethe | Bhaalee charchuni bhasma-chimutaate | Charchitaa jhaale sakala muktu | Saataa une saatashe ||

Ovee 118

ऐसे मुक्त झालें सकळ जनीं । येऊनि लागले गुरुचे चरणीं । नाथ तयालागीं पाहुनी । अहा अहा म्हणतसे ॥

Transliteration

Aise mukta jhaale sakala janee | Yeuni laagale guruche charanee | Naatha tayaa-laagee paahunee | Ahaa ahaa mhanatase ||

Ovee 119

असो ऐसें बोलूनि वचन । तेथूनि टाळितां मगमुक्काम । स्त्रीदेशाचे सीमेवरी जाऊन । वस्तीलागीं विराजती ॥

Transliteration

Aso aise boluni vachanu | Tethuni taalitaa maga-mukkaamu | Stree-deshaache seemevaree jaunu | Vastee-laagee viraajatee ||

Ovee 120

तेथें दिन लोटल्या झाली रात्री । तो चमत्कार वर्तला ते क्षितीं । भुभुःकार द्यावया मारुती । सेतुहूनि चालिला ॥

Transliteration

Tethe dina lotalyaa jhaalee raatree | Toh chamatkaara vartalaa tey kshitee | Bhubhuhkaara dyaavayaa Maarutee | Setuhuni chaalilaa ||

Ovee 121

तों मार्गी येतां अस्त्र सबळ । वेष्टित झालें पदकमळ । परी तो वज्रशरीरी तुंबळ । अस्त्रालागीं मानीना ॥

Transliteration

Toh maargee yetaa astra sabalu | Veshtita jhaale pada-kamalu | Paree toh Vajra-shareeree tumbalu | Astraa-laagee maaneenaa ||

Ovee 122

येरु चित्तामाजी विचार करीत । हें स्पर्शास्त्र आहे निश्चित । तरी येथें कोणी प्रतापवंत । आला आहे निश्चयें ॥

Transliteration

Yeru chittaa-maajee vichaara kareetu | Hey sparsha-astra aahe nishchitu | Taree yethe konee prataapa-vantu | Aalaa aahe nishchaye ||

Ovee 123

ऐसा विचार करुनि चित्तीं । येता झाला सीमेप्रती । तों कटक पाहूनि नाथपंथी । मनांत विचार करीतसे ॥

Transliteration

Aisaa vichaara karuni chittee | Yetaa jhaalaa seemepratee | Toh kataka pahuni Naatha-panthee | Manaanta vichaara kareetase ||

Ovee 124

कीं म्या यत्न करुनि बहुत । तेथें पाठविला मच्छिंद्रनाथ । परी कटक गेलिया तेथ । बोधितील तयासी ॥

Transliteration

Kee myaa yatna karuni bahutu | Tethe paathavilaa Machchindra-Naathu | Paree kataka geliyaa tethu | Bodhiteela tayaasee ||

Ovee 125

मग बोधें होऊनियां स्वार । स्वदेशीं येईल मच्छिंद्र । मग मैनाकिनीमुखचंद्र । दुःखसागरीं उतरेल ॥

Transliteration

Maga bodhe houniyaa svaaru | Svadeshee yaeela Machchindru | Maga Mainaakinee-mukha-chandru | Duhkha-saagaree utarelu ||

Ovee 126

तरी येथेंचि यातें निर्बळ करुन । मागें लावावें परतून । मग अति भीमरुप धरुन । भुभुःकार करीतसे ॥

Transliteration

Taree yethenchi yaate nirbala karunu | Maage laavaave paratunu | Maga ati bheema-rupa dharunu | Bhubhuhkaara kareetase ||

Ovee 127

गाजवी पुच्छाचा फडत्कार । भयंकररुपी अति तीव्र । तें पाहुनिया कटकभार समग्र । स्वामीआड दडताती ॥

Transliteration

Gaajavee puchchaachaa phadatkaaru | Bhayankara-rupee ati teevru | Tey paahuniyaa kataka-bhaara samagru | Svaamee-aada dadataatee ||

Ovee 128

म्हणती महाराजा प्रळयकाळ । प्रथम उदेला महाबळ । आता भक्षील कटक सकळ । उपाय कांहीं योजावा ॥

Transliteration

Mhanatee Mahaaraajaa pralaya-kaalu | Prathama udelaa mahaabalu | Aataa mardeela (bhaksheela) kataka sakalu | Upaaya kaanhee yojaavaa ||

Ovee 129

येरु म्हणे नाहीं भय । उगेचि पहा धरुनि धैर्य । यानें तुमचे करावें काय । अचळपणीं असा रे ॥

Transliteration

Yeru mhane naahee bhayu | Ugechi pahaa dharuni dhairyu | Yaane tumache karaave kaayu | Achalapanee asaa re ||

Ovee 130

मग करीं घेऊनि भस्मचिमुटी । वज्रास्त्र परम बोले होटीं । तो प्रयोग सिद्ध होता दाटीं । भस्मचिमुटी फेंकिली ॥

Transliteration

Maga karee ghevuni bhasma-chimutee | Vajra-astra parama bole hotee | Toh prayoga siddha hotaa daatee | Bhasma-chimutee phenkilee ||

Ovee 131

मग तें वज्रास्त्र परम कठिण । माथां मिरविलें भूषण गगन । येरीकडे वायुनंदन । निजदृष्टी पहातसें ॥

Transliteration

Maga tey vajra-astra parama kathinu | Maathaa miravile bhooshana gaganu | Yereekade vaayu-nandanu | Nija-drishtee pahaatase ||

Ovee 132

मग मोठमोठे उचलून पर्वत । फेंकिता झाला गगनपंथ । ते गिरी आदळतां वज्रास्त्र । चूर्ण होती क्षणार्धें ॥

Transliteration

Maga mothamothe uchaluna parvatu | Phenkitaa jhaalaa gagana-panthu | Tey giree aadalataa Vajra-astru | Choorna hotee kshanaardhe ||

Ovee 133

तें पाहूनि अंजनीसुत । प्रेरिता झाला मुष्टीघात । तेणे वज्र झाले भंगित । निचेष्टित महीं पडलें ॥

Transliteration

Tey pahuni Anjanee-sutu | Preritaa jhaalaa mushtee-ghaatu | Tene Vajra jhaale bhangitu | Nicheshtitu mahee padale ||

Ovee 134

ऐसें होतां प्रकरण । दृष्टी पाहे कर्णनंदन । मग काळिकास्त्र जल्पून । भस्मचिमुटी सोडीतसे ॥

Transliteration

Aise hotaa prakaranu | Drishtee paahe Karna-nandanu | Maga Kaalikaa-astra jalpunu | Bhasma-chimutee sodeetase ||

Ovee 135

यावरी सवेंचि अग्न्यस्त्र । सोडिता झाला प्रयोगमंत्र । त्यावरी सवेंचि वासवास्त्र । वरी वाय्वस्त्र प्रेरिलें ॥

Transliteration

Yavaree savenchi agni-astru | Soditaa jhaalaa prayoga-mantru | Tyaa-varee savenchi Vaasava-astra | Varee vaayu-astra prerile ||

Ovee 136

मग तो वाय्वस्त्रप्रयोग होतां । द्विमूर्धनी दाटला सविता । मग महापर्वत असती स्थूलता । भस्म होती तयानें ॥

Transliteration

Maga toh vaayu-astra-prayoga hotaa | Dvimoordhanee daatalaa savitaa | Maga mahaa-parvata asatee sthoolataa | Bhasma hotee tayaane ||

Ovee 137

तों अंजनीसुतासकट । तो अति तीव्र करीत नेट । याउपरी काय उद्भट । विक्रालरुपी प्रगटला ॥

Transliteration

Toh Anjanee-sutaa-sakatu | Toh ati teevra kareeta netu | Yaauparee kaaya udbhatu | Vikraala-rupee pragatalaa ||

Ovee 138

कीं कृतांत जैसा मुख पसरुन । ग्रासू पाहे सकळ जन । त्यातें साह्य परिपूर्ण । वासवशक्ती मिरवली ॥

Transliteration

Kee Kritaanta jaisaa mukha pasarunu | Graasoo paahe sakala janu | Tyaate saahya paripoornu | Vaasava-shaktee miravalee ||

Ovee 139

जैसा यमामागे दम । प्रगट होय हरुं प्राण । ऐसें उभयास्त्र तरुण । कडकडां करीतसे ॥

Transliteration

Jaisaa Yamaamaage damu | Pragata hoya haru praanu | Aise ubhaya-astra tarunu | Kadakadaa kareetase ||

Ovee 140

जैसे खग मेघडंबरीं । चनका मारिती चपळेपरी । उदेली भक्ती तदनुपरी । प्रणयतरणी मिरवल्या ॥

Transliteration

Jaise khaga megha-dambaree | Chanakaa maaritee chapaleparee | Udelee bhaktee tadanu-paree | Pranaya-taranee miravalyaa ||

Ovee 141

त्यात अग्न्यस्त्राचा ताप थोर । त्यावरी साह्यातें वातास्त्र । मग मारुतिदेह होऊनि जर्जर । रक्षणार्थ कांहीं दिसेना ॥

Transliteration

Tyaata agni-astraachaa taapa thoru | Tyaa-varee saahyaate vaata-astru | Maga Maaruti-deha houni jarjaru | Rakshanaartha kaanhee disenaa ||

Ovee 142

वासव आणि काळिकास्त्र । मागे पुढें होऊनि पवित्र । प्रहर भेदाया पाहती स्वतंत्र । परी वायुपुत्र चपळ तो ॥

Transliteration

Vaasava aani Kaalikaa-astru | Maage pudhe houni pavitru | Prahara bhedaayaa paahatee svatantru | Paree vaayu-putra chapala toh ||

Ovee 143

देई अस्त्रातें दोन हात । ओढिता झाला चपळवंत । तरी तेंही अस्त्र चपळ बहुत । हस्तयुक्त होऊं न देत ॥

Transliteration

Daee astraate dona haatu | Odhitaa jhaalaa chapala-vantu | Taree tehee astra chapala bahutu | Hasta-yukta hooo na detu ||

Ovee 144

यावरी अग्न्यस्त्राकारण । पुच्छीं योजी वायुनंदन । यापरी वातास्त्र कारण । स्तुति विनवोनि आराधिलें ॥

Transliteration

Yavaree agni-astraa-kaaranu | Puchchee yojee vaayu-nandanu | Yaaparee vaata-astra kaaranu | Stuti vinavoni aaraadhile ||

Ovee 145

म्हणे महाराजा प्रळयवंत । प्रविष्ट करा अग्न्यास्त्रांत । तरी तुझा आहे सुत । लोकांमाजी मिरवतसे ॥

Transliteration

Mhane Mahaaraajaa pralaya-vantu | Pravishta karaa agni-astraanta | Taree tujhaa aahe sutu | Lokaa-mmaajee miravatase ||

Ovee 146

परी गृहींचा पाहूनि अनर्थ । कोणता पाहुनि तुष्टला तात । ऐसेया प्रकरणीं हृदयांत । निवारिजे महाराजा ॥

Transliteration

Paree griheenchaa pahuni anarthu | Konataa paahuni tushtalaa taatu | Aiseyaa prakaranee hridayaantu | Nivaarije Mahaaraajaa ||

Ovee 147

ऐसें उत्तर ऐकोनि सावधान । मग बोलवी वायुनंदन । तें वातास्त्र झालें क्षीण । महाप्रतापें आच्छादी ॥

Transliteration

Aise uttara aikoni saavadhaanu | Maga bolavee vaayu-nandanu | Tey vaata-astra jhaale ksheenu | Mahaaprataape aachchaadee ||

Ovee 148

तें पाहुनी कानिफनाथ । मोहनास्त्र प्रेरुनियां त्वरित । तें गुप्तास्त्र हृदयांत । जाऊनि आंत संचरलें ॥

Transliteration

Tey paahunee Kaaniphaa-Naathu | Mohana-astra preruniyaa tvaritu | Tey gupta-astra hridayaantu | Jauni aanta sancharale ||

Ovee 149

संचरलें तरी वज्रशरीर । लाग न धरी मोहनास्त्र । परी कांहींसा भ्रांत वायुकुमर । निजदेहीं दाटला ॥

Transliteration

Sancharale taree Vajra-shareeru | Laaga na dharee mohana-astru | Paree kaanheensaa bhraanta vaayu-kumaru | Nijadehee daatalaa ||

Ovee 150

तरी तैसाचि भ्रांतीमाझारी । अग्न्यस्त्र पुच्छें धरी । महाबळें समुद्रतीरी । भिरकावुनि दिधलें ॥

Transliteration

Taree taisaachi bhraanteemaajhaaree | Agni-astra puchche dharee | Mahaabale samudra-teree | Bhirakaavuni didhale ||

Ovee 151

परी अग्न्यस्त्रें महासबळ । काढूं लागलें समुद्र जळ । जळाचरा ओढवला प्रलयकाळ । तेणें समुद्र गजबजिला ॥

Transliteration

Paree agnyastre mahaa-sabalu | Kaadhoo laagale samudra jalu | Jala-acharaa odhavalaa pralaya-kaalu | Tene samudra gajabajilaa ||

Ovee 152

मग तो येवोनि मूर्तिमंत । निजदृष्टीनें जंव पाहात । तों कानिफा आणि वायुसुत । युद्धालागीं मिरवले ॥

Transliteration

Maga toh yevoni moorti-mantu | Nijadrishteene java paahaatu | Toh Kaaniphaa aani vaayu-sutu | Yuddhaa-laagee miravale ||

Ovee 153

परी तयासी ओढवला प्रळयकाळ । अग्न्यस्त्रातें करी शीतळ । मग जलद आणोनी सकळ । अग्न्यस्त्रीं स्थापिले ॥

Transliteration

Paree tayaasee odhavalaa pralaya-kaalu | Agnyastraate karee sheetalu | Maga jalada aanonee sakalu | Agni-astree sthaapile ||

Ovee 154

तेणे अग्न्यस्त्र झाले शांत । येरीकडे वायुसुत । मोहनप्रकरणीं प्रविष्टचित्त । परी पुच्छीं पर्वत उचलिला ॥

Transliteration

Tene agni-astra jhaale shaantu | Yereekade vaayu-sutu | Mohana-prakaranee pravishta-chittu | Paree puchchee parvata uchalilaa ||

Ovee 155

पर्वत उचलावयाचे संधीं । फाकली होती तिकडे बुद्धी । आणि स्थावरमोह अस्त्रें शुद्धि । भ्रम पडला होताचि ॥

Transliteration

Parvata uchalaa-vayaache sandhee | Phaakalee hotee tikade buddhee | Aani sthaavara-moha astre shuddhi | Bhrama padalaa hotaachi ||

Ovee 156

त्या संधींत दोहींकडून । पाठींपोटी अस्त्रें दोन । एकदांचि भेदिली प्रहार करुन । सबळबळें करुनियां ॥

Transliteration

Tyaa sandheenta doheen-kadunu | Paatheempotee astre donu | Ekadaanchi bhedilee prahaara karunu | Sabala-bale karuniyaa ||

Ovee 157

जैसी मेषाची मूर्धनी । झुंजता एक होय मेळणीं । तैसी पृष्ठीं हृदय लक्षुनी । भेदतीं झालीं तीं अस्त्रें ॥

Transliteration

Jaisee meshaachee moordhanee | Jhunjataa eka hoya melanee | Taisee prishthee hridaya lakshunee | Bhedatee jhaalee tee astre ||

Ovee 158

कालिका आणि वासवशक्ती । भेदितांचि मूर्छित झाली व्यक्ती । तेणें उलंढूनि महीवरती । वातसुत (वायुसुत) पडियेला ॥

Transliteration

Kaalikaa aani vaasava-shaktee | Bheditaanchi moorchita jhaalee vyaktee | Tene ulandhuni mahee-varatee | Vaatasuta (Vaayusuta) padiyelaa ||

Ovee 159

तें पाहूनि अनिळराज । हृदयीं उजळलें मोहबीज । मग प्रत्यक्ष होवोनि तेजःपुंज । तयापासीं पातला ॥

Transliteration

Tey pahuni Anila-raaju | Hridayee ujalale moha-beeju | Maga pratyaksha hovoni tejah-punju | Tayaapaasee paatalaa ||

Ovee 160

परी तो अंजनीचा बाळ । वज्रशरीरी ब्रह्मांडबळ । पुच्छ सांवरोनि उतावेळ । युद्धा मिसळूं पहातसे ॥

Transliteration

Paree toh Anjaneechaa baalu | Vajra-shareeree Brahmaanda-balu | Puchcha saavaroni utaavelu | Yuddhaa misaloo pahaatase ||

Ovee 161

मग श्रीवातें धरुनि हात । म्हणे ऐक मद्वचन सत्य । हे सबळपाणी आहेत नाथ । रळीं यांतें करुं नको ॥

Transliteration

Maga shree-vaate dharuni haatu | Mhane aika madvachana satyu | Hey sabala-paanee aaheta Naathu | Ralee yaante karu nako ||

Ovee 162

पूर्वी पाहे मच्छिंद्रनाथ । तव शिरीं दिधला होता पर्वत । वाताआकर्षणविद्या बहुत । जाज्वल्यें मिरवे यापासीं ॥

Transliteration

Poorvee paahe Machchindra-Naathu | Tava shiree didhalaa hotaa parvatu | Vaataa-aakarshana-vidyaa bahutu | Jaajvalye mirave yaapaasee ||

Ovee 163

तरी आतां सख्य करुन । कार्य काय तें घे साधून । गूळ दिल्या पावे मरण । विष त्यातें नकोचि ॥

Transliteration

Taree aataa sakhya karunu | Kaarya kaaya tey ghe saadhunu | Goola dilyaa paave maranu | Visha tyaate nakochi ||

Ovee 164

यापरी बोले अपांपती । म्हणे हेंचि मानवतें माझे चित्तीं । सख्यासारखी दुसरी युक्ती । योग्यायोग्य दिसेना ॥

Transliteration

Yaaparee bole apaampatee | Mhane henchi maanavate maajhe chittee | Sakhyaa-saarakhee dusaree yuktee | Yogyaayogya disenaa ||

Ovee 165

मग उदधीं आणि द्वितीय वातें । सवें घेऊनि मारुतीतें । कानिफातें घेऊनि त्वरितें । परम प्रीतीनें भेटले ॥

Transliteration

Maga Udadhee aani dviteeya vaate | Save ghevuni Maaruteete | Kaaniphaate ghevuni tvarite | Parama preeteene bhetale ||

Ovee 166

कानिफा तीन्ही देवांसी । नमन करितसे अतिप्रीतीसीं । नमूनि पुढें वायुसुतासी । युद्ध कां सोडिलें म्हणतसे ॥

Transliteration

Kaaniphaa teenhee devaansee | Namana karitase ati-preeteesee | Namuni pudhe vaayu-sutaasee | Yuddha kaa sodile mhanatase ||

Ovee 167

हे ऐकूनि बोले अनिळ । कीं युद्ध कासया करितां तुंबळ । कवण अर्थी तयाचें फळ । आम्हांलागीं दाखवा ॥

Transliteration

Hey aikuni bole Anilu | Kee yuddha kaasayaa karitaa tumbalu | Kavana arthee tayaache phalu | Aamhaa-laagee daakhavaa ||

Ovee 168

नाथ म्हणे तया मारुतीसी । युद्ध करीत होतों कासयासी । मारुती म्हणे कामनेसी । तरी ऐका माझिया ॥

Transliteration

Naatha mhane tayaa Maaruteesee | Yuddha kareeta hoto kaasayaasee | Maarutee mhane kaamanesee | Taree aikaa maajhiyaa ||

Ovee 169

म्यां बहुत यत्नेंकरुन । गौरवोनि मच्छिंद्रनंदन । परम आदरें स्त्रीराज्याकारण । पाठविला आहे कीं ॥

Transliteration

Myaa bahuta yatne-karuni | Gauravoni Machchindra-nandanu | Parama aadare stree-raajyaa-kaaranu | Paathavilaa aahe kee ||

Ovee 170

तरी हे तयाचे असती जाती । तेथें गेलिया तयाप्रती । भेटल्या तयाची समूळ वृत्ती । बोधस्थिती आणितील ॥

Transliteration

Taree hey tayaache asatee jaatee | Tethe geliyaa tayaa-pratee | Bhetalyaa tayaachee samoola vrittee | Bodha-sthitee aaniteelu ||

Ovee 171

मग तो सांडूनि तेथींचे स्थान । स्वदेशांत करील गमन । ऐसी चित्तीं कल्पना आणून । युद्धालागीं मिसळलों ॥

Transliteration

Maga toh sanduni tetheenche sthaanu | Svadeshaanta kareela gamanu | Aisee chittee kalpanaa anunu | Yuddhaa-laagee misalalo ||

Ovee 172

तरी आतां असो कैसें । हा गेलिया स्त्रीराज्यास । कांहीं योग मच्छिंद्रास । बोलूं नये दुरुक्ती ॥

Transliteration

Taree aataa aso kaise | Haa geliyaa stree-raajyaasu | Kaanhee yoga Machchindraasu | Boloo naye duruktee ||

Ovee 173

ऐसे प्रकरणीं भाष्य देऊन । आवश्य करावें यांनीं गमन । मग माझें कांहीं एक छलन । होणार नाहीं नाथासी ॥

Transliteration

Aise prakaranee bhaashya deunu | Aavashya karaave yaannee gamanu | Maga maajhe kaanhee eka chalanu | Honaara naahee naathaasee ||

Ovee 174

ऐसें बोलतां वायुसुत । अपांपति म्हणे बरवें यांत । अहा म्हणूनि वदे मरुतसुत । यांत काय वेंचतसे ॥

Transliteration

Aise bolataa vaayu-sutu | Apaampati mhane barave yaatu | Ahaa mhanuni vade maruta-sutu | Yaanta kaaya venchatase ||

Ovee 175

मग हांसोनि बोलिलें कानिफनाथें । अहा शंका आलिया तुम्हांतें । तरी प्रयोजन काय आमुतें । मच्छिंद्रातें बोलाया ॥

Transliteration

Maga haansoni bolile Kaaniphaa-Naathe | Ahaa shankaa aaliyaa tumhaante | Taree prayojana kaaya aamute | Machchindraate bolaayaa ||

Ovee 176

तरी सहसा आम्ही मच्छिंद्रासी । बोलणार नाहीं दुर्बलेंसी । आणि संबोधूनि त्यासी । तेथील तेथें स्थापूं कीं ॥

Transliteration

Taree sahasaa aamhee Machchindraasee | Bolanaara naahee durbalensee | Aani sambodhuni tyaasee | Tetheela tethe sthaapoo kee ||

Ovee 177

ऐसें वदूनि करतळभाष । देऊनि तुष्ट केलें त्यास । मग आपण आपुल्या स्वस्थानास । त्रिवर्गही चालिले ॥

Transliteration

Aise vaduni karatala-bhaashu | Deuni tushta kele tyaasu | Maga aapana aapulyaa sva-sthaanaasu | Trivargahee chaalile ||

Ovee 178

सकळ गेले स्वस्थानासी । तो उदय झाल्या लोटली निशीं । मग शिष्यकटकेंसी । तेथूनियां निघाले ॥

Transliteration

Sakala gele svasthaanaasee | Toh udaya jhaalyaa lotalee nishee | Maga shishya-katakensee | Tethuniyaa nighaale ||

Ovee 179

स्त्रीराज्यांत प्रवेशून । नाना तीर्थक्षेत्रस्थान । पहात पहात गजनंदन । शृंगमुरडीं पातला ॥

Transliteration

Stree-raajyaanta praveshunu | Naanaa teertha-kshetra-sthaanu | Pahaata pahaata gaja-nandanu | Shringa-muradee paatalaa ||

Ovee 180

तों तें गांवींचे नृपासनीं । तिलोत्तमा मैनाकिनी । मच्छिंद्रासह बैसोनि सभास्थानीं । सेवेलागीं विनटली ॥

Transliteration

Toh tey gaaveenche nripa-aasanee | Tilottamaa Mainaakinee | Machchindraasaha baisoni sabhaa-sthaanee | Seve-laagee vinatalee ||

Ovee 181

तों कानिफनाथ फेरी । आला करीत राजद्वारीं । सवें शिष्य कटक भारी । तों द्वाररक्षक शोधालागीं धांवले ॥

Transliteration

Toh Kaaniphanaatha pheree | Aalaa kareeta raaja-dvaaree | Save shishya-kataka bhaaree | Toh dvaara-rakshaka shodhaalaagee dhaavale ||

Ovee 182

शोधितां शिष्य नयनीं । तो कानिफा कळला कानीं । मग जाऊनियां राजांगणीं । वृत्तांत सुचविला ॥

Transliteration

Shodhitaa shishya nayanee | Toh Kaaniphaa kalalaa kaanee | Maga jauniyaa raaja-anganee | Vrittaanta suchavilaa ||

Ovee 183

म्हणती महाराजा ग्रामद्वारीं । कानिफा सहनाथपरिवारीं । सातशें शिष्य समुद्रलहरी । तव भेटी आलासे ॥

Transliteration

Mhanatee Mahaaraajaa graama-dvaaree | Kaaniphaa saha-Naatha-parivaaree | Saatashe shishya samudra-laharee | Tava bhetee aalaase ||

Ovee 184

हें ऐकूनि मच्छिंद्रनाथ । म्हणे पाहिला तया कोण पंथ । येरी म्हणती म्हणवती नाथ । कानफाटी कर्णी ॥

Transliteration

Hey aikuni Machchindra-Naathu | Mhane paahilaa tayaa kona panthu | Yeree mhanatee mhanavatee Naathu | Kaana-phaatee karnee ||

Ovee 185

ऐसें ऐकूनि मच्छिंद्रनाथ । परम दचकलें तयाचें चित्त । म्हणे आला कीं गोरक्षनाथ । पालटोनि नामातें ॥

Transliteration

Aise aikuni Machchindra-Naathu | Parama dachakale tayaache chittu | Mhane aalaa kee Goraksha-Naathu | Paalatoni naamaate ||

Ovee 186

तरी आतां कैचे येथें । राहूं देईना या सुखातें । अहा तिलोत्तमा सौंदर्यें माते । लाधली होती प्रीतीनें ॥

Transliteration

Taree aataa kaiche yethe | Raahoo daeenaa yaa sukhaate | Ahaa Tilottamaa saundarye maate | Laadhalee hotee preeteene ||

Ovee 187

परी तयामाजी विक्षेप झाला । कीं सैंधवे दुग्धघट नासला । तन्न्यायें न्याय झाला । प्रारब्धवशें आमुचा ॥

Transliteration

Paree tayaa-maajee vikshepa jhaalaa | Kee saindhave dugdhaghata naasalaa | Tannyaaye nyaaya jhaalaa | Praarabdha-vashe aamuchaa ||

Ovee 188

आतां असो कैसे तरी । यासी न्यावें ग्रामाभितरीं । म्हणोनि सिद्ध करोनि स्वारी । अश्वशिबिकेसह निघाला ॥

Transliteration

Aataa aso kaise taree | Yaasee nyaave graamaa-bhitaree | Mhanoni siddha karoni svaaree | Ashva-shibikesaha nighaalaa ||

Ovee 189

त्वरें येऊनि ग्रामद्वारीं । परस्पर भेटी झाल्यावरी । कानिफा पाहोनि हृदयाभीतरी । समाधान मिरवलें ॥

Transliteration

Tvare yeuni graama-dvaaree | Paraspara bhetee jhaalyaa-varee | Kaaniphaa paahoni hridayaa-bheetaree | Samaadhaana miravale ||

Ovee 190

मग आदेशा होऊनि नमन । रुजामे भरजरी कनकवर्ण । महीं पसरुनि योगद्रुम । तयावरी बैसविला ॥

Transliteration

Maga aadeshaa houni namanu | Rujaame bharajaree kanakavarnu | Mahee pasaruni yogadrumu | Tayaa-varee baisavilaa ||

Ovee 191

मग कोण कोनाची समूळ कथा । तदनु पुसतां गुरुचे पंथा । त्यांनींहि सांगितली समूळ वार्ता । जालिंदर जन्मापासूनी ॥

Transliteration

Maga kona konaachee samoola kathaa | Tadanu pusataa guruche panthaa | Tyaanneenhi saangitalee samoola vaartaa | Jaalindara janmaa-paasuunee ||

Ovee 192

मग मच्छिंद्र म्हणे जालिंदरनाथ । देता अनुग्रह उत्तम यात । तरी तूं कानिफा नाम सुत । गुरुबंधु तो माझा ॥

Transliteration

Maga Machchindra mhane Jaalindara-Naathu | Detaa anugraha uttama yaatu | Taree too Kaaniphaa naama sutu | Guru-bandhu toh maajhaa ||

Ovee 193

मग शब्दोशब्दीं अधिकोत्तर । वाढत चालली प्रेमलहर । मग वाहूनि गजस्कंधावर । ग्रामामाजी आणिलें ॥

Transliteration

Maga shabdoshabdee adhikottaru | Vaadhata chaalalee prema-laharu | Maga vaahuni gaja-skandhaa-varu | Graamaa-maajee aanile ||

Ovee 194

मग नानायुक्ती रचोनि चित्तीं । स्वयें करीं मच्छिंद्रजती । एक मास अति प्रीतीं । कानिफा राहविला त्या स्थानीं ॥

Transliteration

Maga naanaa-yuktee rachoni chittee | Svaye karee Machchindra-jatee | Eka maasa ati preetee | Kaaniphaa raahavilaa tyaa sthaanee ||

Ovee 195

राहिला परी तो नाथ कैसा । तरी समूळ कथासुधारसा । पुढिलें अध्यायीं श्रवणीं वसा । श्रवण होईल सकळिकां ॥

Transliteration

Raahilaa paree toh Naatha kaisaa | Taree samoola kathaa-sudhaa-rasaa | Pudhile adhyaayee shravanee vasaa | Shravana hoeela sakalikaa ||

Ovee 196

तरी हा भक्तिकथासार । तुम्हां वैष्णवांचे निजमाहेर । प्रपंच सांडूनि रहावें स्थिर । या धवलगिरीं येऊनि ॥

Transliteration

Taree haa bhakti-kathaa-saaru | Tumhaa vaishna-vaanche nija-maaheru | Prapancha sanduni rahaave sthiru | Yaa dhavala-giree yeuni ||

Ovee 197

धुंडीसुत नरहरिवंशीं । कवि मालू नाम जयासी । तो बैसला ग्रंथमाहेरासी । सुखसंपन्न भोगावया ॥

Transliteration

Dhundeesuta Narahari-vamshee | Kavi Maaloo naama jayaasee | Toh baisalaa grantha-maaheraasee | Sukha-sampanna bhogaavayaa ||

Ovee 198

स्वस्ति श्रीभक्तिकथासार । संमत गोरक्षकाव्य किमयागार । सदा परिसोत भाविक चतुर । पंचदशाध्याय गोड हा ॥

Transliteration

Svasti Shreebhaktikathaa Saaru | Sammata Goraksha-Kaavya Kimayaagaaru | Sadaa parisota bhaavika chaturu | Panchadasha Adhyaaya goda haa ||

श्रीकृष्णार्पणमस्तु । श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ।

Shri Krishnarpanamastu
Shri Dattatreyarpanamastu

इति श्रीनवनाथभक्तिसार पंचदशाध्याय संपूर्ण ।

Iti Shri Navnath Bhaktisar Adhyaya Panchadasha Sampurnah